# पुणे विद्यापीठ

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१) (सी), (जे), (के), (एल), (एम) व (ओ) नुसार अधिसभा सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवरील निवडणूक : शनिवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०११.

## प्रकटन

निवडणूक सूचना क्र. पुविनि/३३२ दिनांक १८ जुलै, २०११ नुसार वर उल्लेख केलेल्या निवडणूकीसाठी आलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी विद्यापीठ कार्यालयात गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी करण्यात आली. उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर ज्यांचे उमेदवारी अर्ज ग्राह्य ठरले आहेत, अशा उमेदवारांची उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम तारखेनंतर वैध नामनिर्देशन अर्जांची संख्या निवडून द्यावयाच्या जागांइतकीच असल्यामुळे खालील उमेदवार व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २७ (१)(ओ) : दोन व्यवस्थापन प्रतिनिधी (पैकी एक महिला प्रवर्गामधून).**

**महिला प्रवर्ग**

१) श्रीमती नवले सुनंदा मारुती
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी,
सर्वे नं. ४४-१, वडगांव बु.,
पुणे - ४११ ०४१.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ४२ मधील तरतूदीनुसार निवडून आलेल्या सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ पर्यंत अथवा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ४३ आणि ४४ मधील तरतूद अथवा महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशाच्या अधीन राहून यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेस संपुष्टात येईल.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. पुविनि/२७(१)/ ३४९
दिनांक : ८ ऑगस्ट, २०११

**मा. कुलगुरु यांच्या आदेशावरून**

**( डॉ. माणिक जाधव )**
**कुलसचिव**

**प्रत :**

१) संबंधित उमेदवार
२) मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग.
४) मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग.
५) मा. कुलगुरुंचे कार्यकारी सहायक
६) सहायक कुलसचिव, सभा व दप्तर विभाग
७) सहायक कुलसचिव, सर्वसाधारण विभाग
८) कक्षाधिकारी, कुलसचिव कार्यालय